नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १०१ Issue - 101 | वार - शुक्रवार दि. ४ सप्टेंबर २०२६ Blow- Friday Date 4 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## नाते, रक्ताचे नाते अन् कुळ.... सरकार कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी तयार

### मंत्र्यांच्या शिष्टमंडळाची शिष्टाई कामाला, जरांगेंचे मराठा समाजाला आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेल्या मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणासाठीच्या उपोषणाला सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचं चित्र आहे. राज्य सरकारच्या मंत्र्यांची शिष्टाई कामाला आली असून उद्यापासून (४ सप्टेंबर) कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याचं आवाहन मराठा समाजाला करण्यात आलं आहे. ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, त्यांनी नातं, रक्ताचं नातं आणि कुळ या मुद्द्यांच्या आधारे अर्ज करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

दरम्यान, मराठा समाजाच्या सगळ्या मागण्या मान्य झाल्याशिवाय मी उपोषण सोडणार नाही, असं जरांगेंनी स्पष्ट केलं. मंत्र्यांना मोकळ्या हाताने परत पाठवणार नाही, एकाच्या ठिकाणी दोन सलाईन लावून घेतो, पण उपोषण मागे घेणार नाही. मी जर असं केलो तर मराठा समाजाचं वाटोळं होईल, ते मला होऊ द्यायचं नाही, असं मनोज जरांगे म्हणाले.

तसेच एकनाथ शिंदे यांना जर मराठा समाजाला साथ द्यायची असेल तर मनापासून साथ द्यावी, असंही जरांगे म्हणाले.

मराठा समाज्याच्या ज्या ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत, त्यांना व्हॅलिडिटी देण्यासोबत इतर मागण्यांसाठी मनोज जरांगे हे गेल्या सहा दिवसांपासून जालन्यातील अंतरवाली सराटीमध्ये आंदोलनासाठी बसले आहेत. त्यांच्या मागण्यांवर राज्य सरकारच्या मंत्र्यांच्या गटाने विचार केला आणि ते मनोज जरांगेंच्या भेटीला आले. या मंत्र्यांच्या शिष्टमंडळामध्ये राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत आणि मकरंद पाटील यांचा समावेश आहे.

कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज करा, जरांगेंचं आवाहन

हैदराबाद गॅझेटनुसार ज्या ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत, त्यांना व्हॅलिडिटीसाठी अर्ज करण्याचं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं आहे. ५



सप्टेंबर पर्यंत ग्रामपंचायतींमध्ये नोंदीची यादी लावण्यात येणार आहे. कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी नोडल अधिकारी नेमण्यात येणार असून त्यामध्ये काही अडचणी आल्या तर जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचं आवाहन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं.

हैदराबाद गॅझेटनुसार ४ सप्टेंबरपासून मराठा समाजाने कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावेत असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं. तसेच सातारा आणि कोल्हापूर गॅझेटचाही जीआर सरकारने काढावा अशी मागणी जरांगे यांनी मंत्र्यांकडे केली. मंत्रालयात आरक्षण कक्ष नको तर मराठा-कुणबी कक्ष स्थापन करा अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली.

कोणत्याही मराठा विद्यार्थ्याचे नुकसान होऊ देणार नाही. जात पडताळणीमुळे विलंब झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक शुल्क परत दिले जाणार, असं आश्वासन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिलं. दर मंगळवारी मराठी उपसमितीची बैठक होते, त्यामध्ये मराठा समाजाचे प्रश्न सोडवले जातील, असंही विखे पाटील म्हणाले.

संजय शिरसाटांवर टीका

मराठा समाजातील मुलांचे प्रमाणपत्र अवैध ठरवण्यामागे संजय शिरसाट यांचा हात असल्याचा आरोप या आधी मनोज जरांगे यांनी केला होता. आताही संजय शिरसाटांच्या नावाचा उल्लेख जरांगे यांनी केला. शिरसाटांनी काय केलं आहे हे माझ्या लक्षात आहे, त्याचं कसं कांड करतो हे बघाच, असं मनोज जरांगे म्हणाले.

## महाप्रसाद, लंगर, भंडाऱ्यांमधील अन्नाची गुणवत्ता आता रडारवर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सण-उत्सवांच्या काळात भाविक आणि नागरिकांना मिळणारा महाप्रसाद, लंगर अथवा भंडाऱ्यांमधील अन्नाची गुणवत्ता आता अन्न आणि औषध प्रशासनाच्या (ऋऊ) थेट रडारवर असणार आहे. अन्न आणि औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सण-उत्सवांच्या काळात होणारी अन्नातील भेसळ रोखण्यासाठी 'स्टँडिंग ऑर्डर्स फॉर ऑल फ`स्टिव्हल्स' हा ऐतिहासिक आणि धर्मनिरपेक्ष निर्णय जाहीर केला आहे. या नियमानुसार, महाप्रसादाच्या ठिकाणांची प्रत्यक्ष तपासणी केली जाईल. भारताच्या इतिहासात सर्व धर्मियांच्या सणांसाठी वर्षभराचा असा स्थायी आदेश काढण्याची ही पहिलीच वेळ आहे.

वार्षिक कॅलेंडर आणि तीन स्तरांवर वर्गीकरण

**तुकाराम मुंढेंनी सर्वधर्मीयांच्या सणासाठी जारी केला थेट 'स्थायी आदेश'**

सणांच्या काळात मिठाई, खवा, पनीर, तूप, सुकामेवा आणि मटण-चिकनची मागणी अनेक पटींनी वाढते; त्यामुळे भेसळीची शक्यताही दाट असते. हे रोखण्यासाठी एफडीएने वर्षभराचे कॅलेंडर तयार केले असून सर्व सणांचे तीन स्तरांत वर्गीकरण केले आहे.

प्रथम श्रेणी (राज्यव्यापी): गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी, ईद, नाताळ (ख्रिसमस) आणि नववर्ष पूर्वसंध्या.

द्वितीय श्रेणी (प्रादेशिक): मकर संक्रांती, महाशिवरात्र, होळी, गुढीपाडवा, आषाढी व कार्तिक वारी, श्रावण मास, जन्माष्टमी, दहीहंडी, कोजागिरी आणि गुरुनानक जयंती.

तृतीय श्रेणी (स्थानिक): स्थानिक जत्रा, पालखी सोहळे आणि उरुस.

चार टप्प्यांत होणार धडक कारवाई

कारवाईची प्रक्रिया ही सणाच्या २१ दिवस आधी सुरू होऊन सण संपल्यानंतर ३० दिवसांपर्यंत सुरू राहील. ही मोहीम एकूण चार टप्प्यांत राबवली जाईल:

पहिला टप्पा (पूर्वतयारी): हाय-रिस्क अन्नाचे नकाशांकन, विशेष पथकांची नियुक्ती आणि

(पान ४ वर...)

## धाराशिवमध्ये आईची तीन मुलांसह नळदुर्ग किल्ल्यावरून उडी; माय-लेकाचा मृत्यू, दोन चिमुकल्या गंभीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग : धाराशिव जिल्ह्यातून एक अत्यंत मन हेलावून टाकणारी आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्ल्यावरून एका आईने आपल्या तीन निष्पाप चिमुकल्या मुलांसह थेट खाली उडी मारली. या दुर्दैवी घटनेत आई आणि एका मुलाचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे, तर दोन लहान मुली गंभीर जखमी झाल्या आहेत. या भीषण घटनेमुळे संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात प्रचंड खळबळ उडाली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने तातडीने मदतकार्य राबवून जखमी चिमुकल्यांना बाहेर काढले. गंभीर जखमी झालेल्या दोन्ही मुलींवर प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील तातडीच्या उपचारासाठी धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, आत्महत्या करणारी महिला ही धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील वंताळा गावची रहिवासी असल्याचे समोर आले आहे.

त्या माऊलीने पोटच्या तीन लहान लेकरांसह नळदुर्ग किल्ल्यासारख्या उंचावरून उडी मारून इतके टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. घरगुती वाद किंवा अन्य काही कारण आहे का, याचा सखोल तपास नळदुर्ग पोलीस करत आहेत.

माय-लेकाच्या अशा अचानक आणि दुर्दैवी अंतामुळे वंताळा गावावर शोककळा पसरली असून दोन गंभीर जखमी चिमुकल्यांच्या प्रकृतीसाठी प्रार्थना केली जात आहे.

## सिंधूचे पाणी रोखलं, पाकिस्तानमध्ये हाहाकार; कोर्टाच्या निर्णयाचा कागद भारताने कचऱ्यात फेकल्याने पाकचा तिळपापड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही, ही भारतीय पंतप्रधानांची घोषणा आता पाकिस्तानसाठी सर्वात मोठा धक्का ठरली आहे. भारताने सिंधू नदीचे पाणी रोखल्यानंतर पाकिस्तानात पाण्यासाठी तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. या परिस्थितीत पाकिस्तान सरकारकडे आता केवळ 'कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन'च्या निर्णयाचा कागद उरला आहे, ज्याला भारताने आधीच बेकायदेशीर आणि अमान्य घोषित केले आहे.

पाकिस्तानच्या सीमापार दहशतवादी कारवायांना उत्तर म्हणून भारताने जेव्हा १९६० चा 'सिंधू पाणी करार' स्थगित केला, तेव्हा शहबाझ शरीफ सरकारची मोठी कोंडी झाली. पाकिस्तानने नेदरलँड्स येथील न्यायालयात भारताची तक्रार केली होती. न्यायालयाने १९६० चा करार लागू ठेवण्याचे आदेश दिले असले तरी, भारताने स्पष्ट केले आहे की भारत या न्यायालयाचे अधिकारक्षेत्र मानत नाही. त्यामुळे हा निकाल भारतासाठी केवळ 'कागदाचा तुकडा' आहे.

आंतरराष्ट्रीय न्यायालयात भारताने उपस्थित राहण्यास आणि निकाल मानण्यास नकार दिल्यानंतर पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने यावर तीव्र विरोध दर्शवला आहे. ६० वर्षे जुना हा जलवाटप करार कायदेशीररीत्या बंधनकारक असून कोणताही देश एकतर्फी निर्णय घेऊ शकत नाही, असा दावा इस्लामाबादने केला आहे. पाकिस्तानने शांघाय सहकार्य संघटनेच्या व्यासपीठावरही हा मुद्दा उपस्थित केला, मात्र भारताने आपली भूमिका ठाम ठेवली आहे. नवी दिल्लीने सिंधू पाणी करार पूर्णपणे स्थगित ठेवला आहे. पाकिस्तानने जोपर्यंत सीमापार दहशतवाद कायमस्वरूपी आणि पडताळणीयोग्य पद्धतीने थांबवला जात नाही, तोपर्यंत या करारावर पुनर्विचार केला जाणार नाही, अशी भारताची अट आहे. तसेच, हेग येथील स्थायी लवाद न्यायालयाची स्थापना करारातील मूळ नियमांचे उल्लंघन करून झाली आहे, त्यामुळे त्याचे कोणतेही अंतरिम आदेश भारताच्या सार्वभौम धोरणांवर लागू होत नाहीत.

पाकिस्तान आंतरराष्ट्रीय मध्यस्थीद्वारे भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहे, परंतु त्याचा फारसा परिणाम झालेला नाही. बिश्केक येथे झालेल्या बैठकीत पाकिस्तानने सिंधू नदीच्या पाण्याचा मुद्दा मांडला, परंतु त्याचा मित्र देश असलेल्या चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनीही यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. भारताने स्पष्ट केले आहे की, द्विपक्षीय मुद्द्यांवर तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही.

## गणेशोत्सवातील उत्कृष्ट सार्वजनिक मंडळांसाठी राज्यस्तरीय स्पर्धा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिल्यानंतर या उपक्रमाचा विस्तार राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर केला आहे. २०२६ च्या गणेशोत्सवात उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्रासह देशातील तसेच परदेशातील सामाजिक व विधायक उपक्रमांद्वारे गणेशोत्सव साजरा करणाऱ्या सार्वजनिक मंडळांनाही या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे.

**सहभागासाठी मंडळांना ७ सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करण्यास मुदत**

या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावेत. अर्जासाठी https://ganeshotsav.pldmka.co.in/ या संकेतस्थळाचा वापर करावा. इच्छुक मंडळांनी विहित नमुन्यातील माहिती व आवश्यक कागदपत्रे सादर करून या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.

यंदाचा गणेशोत्सव १४ सप्टेंबर २०२६ पासून सुरू होत असून उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या समित्यांकडून मंडळांच्या उत्सवस्थळी प्रत्यक्ष भेट देऊन विविध निकषांच्या आधारे अभिप्रायासह गुणांकन करण्यात येणार आहे.

जिल्हास्तरीय समिती उत्कृष्ट तीन गणेशोत्सव मंडळांची शिफारस करणार असून, संबंधित मंडळांची नावे, आवश्यक कागदपत्रे, व्हिडीओ व अभिप्राय यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत प्रकल्प संचालक, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर राज्यस्तरीय समितीमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल. स्पर्धेचा निकाल जाहीर करण्याची तारीख तसेच विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या पुरस्कार वितरण समारंभाबाबत स्वतंत्र सूचना देण्यात येतील, असेही मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी कळविले आहे.

### बाह्यस्रोतांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवांचा घेतला आढावा

## आरोग्यसेवांच्या गुणवत्तेवर आता स्टार रेटिंगची नजर : मंत्री प्रकाश आबिटकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत व बाह्यस्रोतांमार्फत दिल्या जाणाऱ्या आरोग्यसेवांच्या गुणवत्तेवर आता स्टार रेटिंग प्रणालीची नजर राहणार असून, सेवांमध्ये कोणताही गैरप्रकार,अनियमितता, गुणवत्तेची कमतरता आढळल्यास संबंधित संस्थांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिला.

मुंबईत आरोग्यसेवा आयुक्तालयात सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत बाह्यस्रोतांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवांचा आढावा घेण्यात आला. यांत्रिक धुलाई, प्रयोगशाळा (एचएलएल) सेवा,रक्त तपासणी, एक्स-रे, टेलिरॅडिओलॉजी, सिटी स्कॅन, एमआरआय, उपकरणांची देखभाल-दुरुस्ती, डायलिसिस, आहार पुरवठा, स्वच्छता तांत्रिक सहाय्य, आदी सेवांचा यावेळी आढावा घेण्यात आला.

नागरिकांना दर्जेदार सेवा मिळणे ही विभागाची प्राथमिकता आहे. त्यामुळे बाह्यस्रोतांमार्फत दिल्या जाणाऱ्या प्रत्येक सेवेचे नियमित परीक्षण आणि मूल्यांकन करावे. जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सेवांची नियमित तपासणी करून गुणवत्तेचा अहवाल सादर करावा, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

राज्यातील सार्वजनिक आरोग्य संस्थांमधील सेवांचे प्रमाणीकरण आणि गुणवत्तावाढ करण्यासाठी रुग्णालयांची स्टार रेटिंग प्रणाली सुरू करण्यात आली आहे. या प्रणालीअंतर्गत विशेष वैद्यकीय सेवांची उपलब्धता, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती,



औषधांचा पुरवठा, प्रयोगशाळा सेवा, बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवा, प्रसूती व शस्त्रक्रियांची संख्या, स्वच्छता, उपलब्ध सुविधांचा वापर आणि रुग्णांचे अभिप्राय आदी निकषांवर आरोग्य संस्थांचे मूल्यांकन केले जाणार आहे.

राज्यातील सर्व सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये महिला बचत गटांच्या माध्यमातून सकस व आरोग्यदायी आहार पुरवठा करण्याच्या स्थानिक आमदारांच्या सहभागाने आरोग्य समितीच्या बैठका घेऊन त्यातील कार्यवाहीची अंमलबजावणी आणि त्याबाबतचा अहवाल तयार करावा, नोव्हेंबर महिन्यात जनआरोग्य समितीची राज्यस्तरीय बैठक होणार असून, त्यापूर्वी राज्यातील सर्व जन आरोग्य समित्या प्रभावी पने कार्यान्वित असाव्यात, असे आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सार्वजनिक आरोग्य विभागाच्या एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड, एकात्मिक आरोग्य सुविधा केंद्र आणि रुग्णालयांची स्टार रेटिंग प्रणाली या तीन महत्वपूर्ण उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला आहे. राज्यातील आरोग्यविषयक माहितीचे केवळ संकलन न करता तिचा लोकहितासाठी प्रभावी वापर करावा आणि नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करावी,असे शासनाचे धोरण असल्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

बैठकीस आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव इ. रवींद्रन, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, शहरी आरोग्य अभियान आयुक्त डॉ. सुनील भोकरे, रुग्णालय-आरोग्य सेवा सहसंचालक डॉ. सुनीता गोल्हाईत तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यातील सर्व जिल्ह्यांचे जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, उपसंचालक आणि वैद्यकीय अधीक्षक सहभागी झाले होते.

## संपादकीय....

### तिढा सुटणार...!

गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेल्या मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणासाठीच्या उपोषणाला सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचं चित्र आहे. राज्य सरकारच्या मंत्र्यांची शिष्टाई कामाला आली आहे. कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याचं आवाहन मराठा समाजाला करण्यात आलं आहे. ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, त्यांनी नातं, रक्ताचं नातं आणि कुळ या मुद्द्यांच्या आधारे अर्ज करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. दरम्यान, मराठा समाजाच्या सगळ्या मागण्या मान्य झाल्याशिवाय मी उपोषण सोडणार नाही, असं जरांगेंनी स्पष्ट केलं. मंत्र्यांना मोकळ्या हाताने परत पाठवणार नाही, एकाच्या ठिकाणी दोन सलाईन लावून घेतो, पण उपोषण मागे घेणार नाही. मी जर असं केलो तर मराठा समाजाचं वाटोळं होईल, ते मला होऊ द्यायचं नाही, असं मनोज जरांगे म्हणाले. तसेच एकनाथ शिंदे यांना जर मराठा समाजाला साथ द्यायची असेल तर मनापासून साथ द्यावी, असंही जरांगे म्हणाले. मराठा समाज्याच्या ज्या ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत, त्यांना व्हॅलिडिटी देण्यासोबत इतर मागण्यांसाठी मनोज जरांगे हे गेल्या सहा दिवसांपासून जालन्यातील अंतरवाली सराटीमध्ये आंदोलनासाठी बसले आहेत. त्यांच्या मागण्यांवर राज्य सरकारच्या मंत्र्यांच्या गटाने विचार केला आणि ते मनोज जरांगेंच्या भेटीला आले. या मंत्र्यांच्या शिष्टमंडळामध्ये राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत आणि मकरंद पाटील यांचा समावेश आहे. हैदराबाद गॅझेटनुसार ज्या ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत, त्यांना व्हॅलिडिटीसाठी अर्ज करण्याचं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं आहे. ५ सप्टेंबर पर्यंत ग्रामपंचायतींमध्ये नोंदीची यादी लावण्यात येणार आहे. कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी नोडल अधिकारी नेमण्यात येणार असून त्यामध्ये काही अडचणी आल्या तर जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचं आवाहन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं.

# श्रीकृष्ण जन्माष्टमी : भ. श्रीकृष्णाचा जन्मोत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

(४ सप्टेंबर: श्रीकृष्ण जन्माष्टमी पवित्र उत्सव.)

श्रीकृष्ण जन्माष्टमी हा श्रीकृष्णाच्या जन्मोत्सवाचा पवित्र हिंदू सण आहे, जो कृष्ण जन्माष्टमी श्रावण किंवा भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्षातील अष्टमीला साजरा केला जातो. मथुरेमध्ये कंसाच्या बंदिशाळेत मध्यरात्री रोहिणी नक्षत्रावर श्रीकृष्णाचा जन्म झाला. दुसरा दिवस- गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी दहीहंडीचा उत्सव महाराष्ट्रसह देशभरात अत्यंत आनंदाने साजरा केला जातो. मथुरा, वृंदावन, गोकुळ आणि द्वारकेमध्ये या दिवशी विशेष पूजा व सोहळे होतात. भाविक जन्माष्टमीच्या दिवशी दिवसभर उपवास करतात आणि कृष्ण जन्माष्टमीच्या रात्री उपवास सोडतात. पाळण्यात बालगोपाळाची- श्रीकृष्णाची मूर्ती ठेवून सनातन संस्थानुसार रात्री १२ वाजता पाळणा गाऊन पूजा केली जाते. श्रीकृष्णाला लोणी, साखर व धने-जिऱ्याची पंजीरी यांचा नैवेद्य दाखवला जातो.

भगवान श्रीविष्णुचा पूर्णावतार असलेल्या श्रीकृष्णाने श्रावण कृष्ण पक्ष अष्टमीला पृथ्वीतलावर जन्म घेतला. ती वेळ मध्यरात्री, रोहिणी नक्षत्रावर चंद्र वृषभ राशीत असतांनाची होती. हा दिवस कृष्ण जन्माष्टमी, गोकुळाष्टमी, श्रीकृष्ण जयंती आदी नावांनी ओळखला जातो. कृष्ण जन्माष्टमी या दिवशी भगवान कृष्णाचे तत्त्व वातावरणात नेहमीपेक्षा १००० पटीने कार्यरत असते. या दिवशी ॐ नमो भगवते वासुदेवाय। हा नामजप, तसेच श्रीकृष्णाची अन्य उपासना भावपूर्ण केल्यास श्रीकृष्णाचा आशीर्वाद अधिक

प्रमाणात ग्रहण करता येऊन त्याचा लाभ होतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे. या दिवशी दिवसभर उपवास करून रात्री बारा वाजता बाळकृष्णाचा जन्म साजरा करतात, त्यानंतर प्रसाद घेऊन उपवास सोडतात किंवा दुसर्या दिवशी सकाळी दहीकाल्याचा प्रसाद घेऊन उपवास सोडतात. श्री कृष्णाच्या जन्माची वेळ रात्री १२ वाजता असल्यामुळे त्यापूर्वी पूजनाची सिद्धता करून ठेवावी लागते. रात्री १२ वाजता शक्य असल्यास श्री कृष्ण जन्माचा पाळणा (गीत) गायले किंवा वाजविले जाते.

य प्रदेश, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश, तामिळनाडू येथे साजरा केला जातो. याशिवाय भारतातील इतर सर्व राज्ये आणि उमरकोट, थारपारकर, मीरपूरखास आणि संपूर्ण सिंध पाकिस्तानमध्ये देखील हा उत्सव साजरा केला जातो. गोकुळ, मथुरा, वृंदावन, द्वारका,जगन्नाथ पुरी या ठिकाणी वैष्णव संप्रदायाचे वैशिष्ट्य असलेली मंदिरे असल्याने तो येथे मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. ओरिसामध्ये दहीहंडी जत्रा किंवा दहीभंगा जत्रा या दिवशी साजरी केली जाते. गोकुळ अष्टमीच्या दिवशी उपवास करण्याची प्रथा आहे. गुजराथमध्ये 'सातम' म्हणजे सप्तमीच्या दिवशी पैसे लावून किंवा तसेच दिवसभर पत्ते खेळतात. रात्री बारा वाजता पत्ते बंद करून कृष्णजन्माचा उत्सव सुरू करतात. मध्य प्रदेशात आणि उत्तरी भारताच्या बऱ्याचशा भागात पौर्णिमान्त महिना असलेले पंचांग वापरात असल्याने या दिवशी त्यांची भाद्रपद कृष्ण अष्टमी येते. या दिवशी कित्येकांच्या घरी गोकुळ-वृंदावनाचा देखावा तयार करून जन्मोत्सव साजरा करतात. वैष्णव लोक तर हा दिवस विशेष भक्तीभावाने पाळतात. वृंदावन येथे या दिवशी दोलोत्सव असतो. याच दिवशी कृष्णाच्या आयुष्यातील महत्त्वाची संकल्पना रासलीलांचे सादरीकरण केले जाते. मणिपूर येथे दिवसभर उपवास करून रात्री कृष्णाची पूजा केली जाते. हनुमान मंदिर, गोविंदजी मंदिर येथे विशेष पूजा होते, जत्रा भरते, लोक उत्सवाचा आनंद घेतात.

व्रत :अष्टमीच्या दिवशी एकभुक्त राहून पांढऱ्या तिळाचा कल्क अंगाला लावून स्नान करतात. व्रताचा संकल्प करून देवघर लता पल्लवीने सुशोभित करतात. त्या स्थानी देवकीचे सूतिकागृह स्थापन करतात. मंचकावर देवकी आणि कृष्ण यांच्या मूर्तीची स्थापना करतात. दुसऱ्या बाजूला यशोदा आणि तिची नवजात कन्या, वसुदेव, नंद, यांच्या मूर्ती बसवितात. सप्तमीच्या मध्यरात्री शुचिर्भूत होऊन संकल्प करतात व सहपरिवार श्रीकृष्णाची षोडशोपचारे पूजा करतात. रात्रौ कथा, पुराण, नृत्य, गीत इ. कार्यक्रमांनी जागरण करतात. अष्टमीच्या दिवशी उपवास करतात व देवालाही फराळाच्या जिन्नसांचा नैवेद्य दाखवितात. नवमीच्या दिवशी पंचोपचार करून उत्तरपूजा करून महानैवेद्य समर्पण करतात. पूजा झाल्यानंतरचे कृत्य अग्नी पुराणात सांगितले आहे. त्याप्रमाणे पूजा करून पुरुषसूक्ताने, विष्णूसूक्ताने व इतर स्तोत्रांनी स्तवन करावे. वाद्यांचा घोष, गीतांचे मंगल स्वर, पुराण-इतिहासातील निरनिराळ्या सत्कथा ऐकत ती रात्र घालवली जाते. गोकुळातील श्रीकृष्णजन्माच्या लीला श्रवण केल्यानंतर वैष्णवांनी परस्परांवर दही इ.चे सिंचन करावे. कारण गोपाळांनी दही, दूध, तूप, उदक, यांनी परस्परांवर सिंचन व लेपन केले, असे भागवतामध्ये वचन आहे, त्यावरून असा विधी प्राप्त होतो. कृष्णाला लोणी आणि साखर एकत्र करून त्याचा प्रसाद दिला जातो. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**– संकलन व सुलेखन –**

**श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरुजी.**

**दनविशेषकार)**

**राह. श्रीगुरूदेव हरदेवकृपा निवास, एकता चौक, पॉवर हाऊसच्या मागे, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**

**फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.**

# 'महा-टॅक' च्या माध्यमातून शासकीय योजना-धोरणांचे स्वतंत्र मूल्यमापन करण्यात येणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

- **आयआयएम मुंबई आणि सीआरआयएसपी यांच्या सहकार्याने महा–टॅक उपक्रम**
- **सशक्त अभियानांद्वारे लोककल्याणकारी योजनांना गती मिळणार**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मुंबई : राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध महत्वपूर्ण योजना आणि धोरणांचा प्रत्यक्ष परिणाम तपासण्यासाठी तसेच सार्वजनिक निधीच्या खर्चातून अपेक्षित परिणाम साध्य होत आहेत का, याचे मूल्यमापन करण्यासाठी 'महाराष्ट्र टेक्निकल असिस्टन्स सेल' (महा–टॅक) स्थापन करण्यात येणार आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, मुंबई आणि सेंटर फॉर रिसर्च इन स्कीम्स अँड पॉलिसीज (सीआरआयएसपी) यांच्या सहकार्याने हा कक्ष कार्यरत केला जाणार असून, त्यातून शासनाला वस्तुनिष्ठ माहिती व डेटा–आधारित निर्णय घेण्यास मदत होणार आहे. 'महा–टॅक' च्या माध्यमातून लोककल्याणकारी योजनांचे मूल्यमापन आणि प्रभावी अंमलबजावणीला गती मिळेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महा–टॅकच्या स्थापनेसंदर्भात आयआयएम, मुंबईच्या वतीने सादरीकरण करण्यात आले. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ श्रीकर परदेशी, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणूगोपाल रेड्डी, आयआयएमचे संचालक मनोज कुमार तिवारी विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्य शासन विविध लोककल्याणकारी योजना राबवत आहे. या योजना अधिक प्रभावी, पारदर्शक आणि वेळेत जनतेपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. योजनांच्या अंमलबजावणीबाबत अचूक आणि वस्तुनिष्ठ माहिती वेळेत उपलब्ध झाल्यास त्यातील त्रुटी ओळखून तातडीने सुधारात्मक उपाययोजना करणे शक्य होईल. त्यामुळे प्रत्येक योजनेची सविस्तर माहिती, अंमलबजावणी आणि लाभार्थ्यांवरील परिणाम याबाबतचा डेटा महा–टॅककडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. या माध्यमातून उपलब्ध होणारा वस्तुनिष्ठ डेटा शासनाच्या निर्णयप्रक्रियेला अधिक सक्षम आणि प्रशासनाला अधिक कार्यक्षम बनवेल. विभागप्रमुखांनी या उपक्रमाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून प्रभावी अंमलबजावणीसाठी सहकार्य करावे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

महा–टॅकच्या माध्यमातून शासनाच्या २५ प्रमुख धोरणांचे विश्लेषण करण्यात येणार आहे. विविध विभागांच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतील अडथळे ओळखून ते दूर करण्यासाठी तसेच निर्णय प्रक्रियेला गती देण्यासाठी १३ 'सशक्त अभियान' स्थापन करण्यात येणार आहेत. लॉजिस्टिक्स आणि मेरीटाईम यांसारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रांचाही या अभियानांमध्ये समावेश असेल.

या अभियानांची उद्दिष्टे निश्चित करण्यापासून ते अंमलबजावणीतील त्रुटी दूर करण्यासाठी आवश्यक अधिकार निश्चित करण्यापर्यंतची प्रक्रिया मंत्रिमंडळाच्या मंजुरीने करण्यात येणार आहे. यामध्ये राज्यातील २५ प्रमुख कल्याणकारी योजनांचे दर तीन महिन्यांनी स्वतंत्र फिल्ड सर्वेक्षण करण्यात येणार आहे. दर तिमाहीला राज्यातील १२ जिल्ह्यांमधील ११ हजार ६०० लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येतील. तसेच सुमारे १ हजार ५०० वंचित घटकांची तपासणी केली जाणार आहे. वर्षभरात एकूण ४६ हजार ४०० लाभार्थ्यांच्या मुलाखती घेऊन योजनांचे नियमपालन, खर्चाची परिणामकारकता, लाभार्थ्यांपर्यंत पोहोच आणि विविध विभागांमधील समन्वय यांचे मूल्यमापन केले जाईल.या मूल्यमापनातून प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे प्रशासनाला तातडीने सुधारणा करणे शक्य होईल.

महा–टॅकच्या माध्यमातून केवळ योजनांची नियमांनुसार अंमलबजावणी झाली की नाही, याची तपासणी करण्याऐवजी 'लाभार्थ्यांपर्यंत लाभ' आणि 'खर्चातून परिणाम' या दोन्ही बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या धोरणनिर्मितीपासून ते खर्च व्यवस्थापनापर्यंत डेटा–आधारित निर्णयप्रक्रियेला अधिक बळ मिळणार आहे.

हा कक्ष मुख्यमंत्री कार्यालय, मुख्य सचिव आणि निवृत्त सचिवांच्या उच्चाधिकार समितीला उत्तरदायी राहणार असल्याने योजनांच्या परिणामांचे स्वतंत्र आणि वस्तुनिष्ठ मूल्यमापन होण्यास मदत होईल. या तांत्रिक टीमच्या माध्यमातून उपलब्ध माहितीचे विश्लेषण, फिल्ड सर्वेक्षण, योजनांच्या परिणामांचे मूल्यमापन आणि शासनाला आवश्यक सुधारणा व निर्णयांसाठी तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.अशी माहिती सादरीकरण्याच्या माध्यमातून देण्यात आली.

# सहकारी साखर कारखान्यांसाठी 'सॉफ्ट लोन योजना' लागू करण्यासंदर्भात मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करा

- **उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे निर्देश**
- **सहकारी साखर कारखान्यांमधून तयार होणाऱ्या उपपदार्थांसाठी स्वतंत्र धोरण आखणार**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना पुढील गाळप हंगामाच्या पूर्वतयारीसाठी आणि शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम वेळेत देण्यास मदत व्हावी, या उद्देशाने केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यात 'सॉफ्ट लोन योजना' लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव तात्काळ मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी साखर कारखान्यांसाठी सॉफ्ट लोन पॉलिसी आणि उपपदार्थ निर्मिती धोरण निश्चित करण्याबाबत बैठक पार पडली.

**उपपदार्थांसाठी स्वतंत्र धोरण आखणार**

साखर कारखान्यांची आर्थिक क्षमता वाढवण्यासाठी केवळ साखरेवर अवलंबून न राहता उपपदार्थांच्या निर्मितीला चालना देणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्र्यांनी सहकारी साखर कारखान्यांमधून तयार होणाऱ्या विविध उपपदार्थांसाठी सर्वसमावेशक धोरण ठरवण्याची सूचना केली. या धोरणामुळे कारखान्यांमध्ये सौर ऊर्जा, सह–वीज निर्मिती, इथेनॉल(१ऋ), मल्टिफीड, २ऋइथेनॉल, सीबीजी, हरित हायड्रोजन, बायो बिटुमिन, जैव रसायने आणि एसएएफ या घटकांच्या निर्मितीस गती मिळणार आहे.

या बैठकीला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, वित्त विभागाचे सहसचिव माधव वीर, नियोजन विभागाच्या उपसचिव सविता जावळे आदी मान्यवर उपस्थित होते.

**मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयाने विधानभवन येथे पत्रकारांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबीर**

# सतत कार्यरत असणाऱ्या पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेण्याला प्राधान्य - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मुंबई : सतत कार्यरत असणाऱ्या पत्रकारांना अनियमित कामाच्या वेळांमुळे, तासनतास रस्त्यावर आणि घटनास्थळी राहून काम करावे लागल्याने त्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेले आरोग्य तपासणी आणि उपचार शिबीर महत्वाचे ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयाने विधानभवन येथे पत्रकारांसाठी विशेष आरोग्य तपासणी, उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विविध तपासणी आणि उपचार शिबीराला भेट देऊन पत्रकारांच्या आरोग्याची आस्थेने विचारपूस केली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर, विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर, आमदार योगेश सागर, आमदार अभिमन्यू पवार, आदींसह विविध पत्रकार संघटनांचे पदाधिकारी, पत्रकार उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पत्रकारांचे काम हे २४ तास सुरू असते. कामाचे निश्चित वेळापत्रक नसल्याने अनेकदा तासनतास रस्त्यावर, घटनास्थळी तसेच रात्री–अपरात्री काम करावे लागते. त्याचा साहजिकच आरोग्यावर परिणाम होतो. अनेकदा नियमित आरोग्य तपासण्या होत नसल्यामुळे एखादा आजार बळावल्यानंतर त्याचे निदान होते. त्याऐवजी अशा आरोग्य तपासणी शिबिरांच्या माध्यमातून प्राथमिक लक्षणे वेळीच ओळखून त्यावर तातडीने उपचार करता येतील. या शिबिरामध्ये विविध तज्ज्ञ डॉक्टर, नामांकित संस्था आणि आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पत्रकारांसोबतच तासनतास उभे राहून काम करणाऱ्या कॅमेरामनसाठीही आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. व्हेरिकोज व्हेन्ससारख्या समस्यांसाठी स्टॉकिंगची व्यवस्था तसेच आपत्कालीन परिस्थितीत उपयोगी ठरणाऱ्या विविध सुविधांचा समावेश करण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले.

**पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबाच्या मदत व समन्वयासाठी नोडल अधिकारी**

पत्रकारांच्या सर्व संघटनांनी एकत्र येऊन हा उपक्रम आयोजित केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी सर्व संघटनांचे अभिनंदन केले. पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांना आजारपणाच्या प्रसंगी आवश्यक ती मदत व समन्वय उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आला आहे. संबंधित अधिकारी पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांना आवश्यक उपचार, शस्त्रक्रिया किंवा वैद्यकीय समन्वयासाठी मदत करणार आहे. हे आरोग्य तपासणी शिबीर मर्यादित न राहता वर्षभर सातत्याने पत्रकारांना आरोग्यविषयक आवश्यक मदत मिळावी, यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या पुढाकाराने पत्रकारांना एकाच ठिकाणी विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी व आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन मिळाले. मुख्यमंत्री सहायता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून राबविण्यात आलेला हा उपक्रम पत्रकारांच्या आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरल्याची प्रतिक्रिया पत्रकारांनी व्यक्त केली.

**शिबिरात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी**

या शिबिरात विविध वैद्यकीय विभागांमार्फत पत्रकारांची सर्वसमावेशक आरोग्य तपासणी करण्यात आली. न्यूरोलॉजिस्ट तथा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्यंकट गीते, जे.जे. रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय भंडारवार, पुणे बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार,ज्येष्ठ नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. तात्यासाहेब लहाने,पोटविकार तज्ज्ञ डॉ. अमित मायदेव, लठ्ठपणा निवारण तज्ज्ञ डॉ. जयश्री तोडकर, यकृत प्रत्यारोपण व पोटविकार तज्ज्ञ डॉ. विभा वर्मा हृदयरोगतज्ज्ञ डॉ. कल्याण मुंडे, जनरल मेडिसिन डॉ. मधुकर गायकवाड, यांच्यासह विविध क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांनी पत्रकारांशी संवाद साधत आरोग्यविषयक तपासणी करीत मार्गदर्शन केले.

शिबिरामध्ये प्राथमिक तपासणी, नेत्ररोग, त्वचारोग, हृदयरोग, स्त्रीरोग, फिजिओथेरपी, जनरल मेडिसिन, अस्थिरोग, कर्करोग, रक्त तपासणी, श्वसनविकार, पोट व पचनसंस्थेचे विकार, कान-नाक-घसा, मानसिक आरोग्य, औषध वितरण, वजन नियंत्रण, आयव्हीएफ व वंध्यत्व उपचार, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग तपासणी आदी विविध वैद्यकीय विभागांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच दंतचिकित्सा, कर्करोग व नेत्ररोग तपासणीसाठीही स्वतंत्र सुविधा ठेवण्यात आली होती.

विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे आणि विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी शिबिरातील विविध विभागांना भेट देऊन डॉक्टर, वैद्यकीय पथक आणि पत्रकारांशी संवाद साधला. पत्रकारांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या आरोग्य सुविधांची त्यांनी पाहणी केली.

शिबिरामध्येजे.जे.रुग्णालय, जी. टी. रूग्णालय, सेंट जॉर्ज, कामा रुग्णालय, शासकीय दंत महाविद्यालय, आर. ए. पोदार, के. जी. मित्तल, मुंबादेवी रूग्णालय, कुपर रुग्णालय, नायर, बॉम्बे हॉस्पिटल, हिंदूजा हॉस्पिटल, रिलाईन्स रुग्णालय आणि सेफी रुग्णालयासह मनपा रूग्णालयातील विविध आजारांचे सुमारे ६०० तज्ज्ञ डॉक्टर आणि इतर सहायक सहभागी झाले होते. सकाळी ९ वाजल्यापासून सायंकाळी साडेचार वाजेपर्यंत सुमारे ८९२ पत्रकार आणि इतरांची तपासणी आणि औषधोपचार करण्यात आले. शिवाय काही पत्रकारांना शासकीय रूग्णालयात संदर्भित करण्यात आले. मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघ, मुंबई मराठी पत्रकार संघ, प्रेस क्लब, टेलिव्हीजन जर्नालिस्ट असोसिएशन (टिव्हीजेए, मुंबई हिंदी पत्रकार संघ, मुंबई क्राईम रिपोर्टस असोसिएशन, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, बॉम्बे न्युज फोटोग्राफर असोसिएशन, बृहन्मुंबई महानगरपालिका वार्ताहर संघ, व्हॉइस ऑफ मिडिया, पत्रकार विकास संघांचे पदाधिकारी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# शेतकऱ्यांनो, वर्षानुवर्षे सुरू असलेला महसुली दावा आता तडजोडीने मिटवण्याची संधी

## निफाड तहसील कार्यालयात ‘महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोकअदालत’ अभियान; १ सप्टेंबर २०२६ ते दि. ३१ मार्च २०२७ पर्यंत अभियान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार दि. १ सप्टेंबर २०२६ ते दि. ३१ मार्च २०२७ या कालावधीत राज्यभर महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोकअदालत अभियान राबविण्यात येत आहे. निफाड तहसील कार्यालय व उपविभागीय अधिकारी कार्यालय मार्फतही या अभियानाची दिनांक ५ ऑक्टोबर रोजी प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

महसूल प्रशासनातील तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांच्या अधिनस्त न्यायालयांमध्ये जमीन व इतर महसुली बाबींशी संबंधित अनेक दावे व अपील प्रलंबित असतात. हे दावे दीर्घकाळ सुरू राहिल्यामुळे संबंधित पक्षकारांचा वेळ, पैसा आणि श्रम खर्च होतात. शासनाने ही बाब लक्षात घेऊन दोन्ही पक्षकारांच्या परस्पर संमतीने व तडजोडीने महसुली दावे निकाली काढण्यासाठी हे विशेष अभियान सुरू केले आहे.

शेतकऱ्यांसाठी लोकअदालत म्हणजे काय?

शेतजमिनीच्या रस्त्या संदर्भात वाद, हक्काबाबतचा वाद किंवा इतर महसुली प्रकरणामुळे अनेकदा शेतकऱ्यांना वारंवार कार्यालयात यावे लागते. प्रकरणाचा निकाल लागण्यासाठी बराच काळ जातो आणि त्यात वेळ व पैसा खर्च होतो.

लोकअदालतीचा साधा अर्थ असा – दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून, दोन्ही पक्षकारांची संमती असेल तर आपसात तडजोड करून प्रकरण कायमचे निकाली काढण्याची संधी.

म्हणजेच, वाद वाढविण्याऐवजी संवादातून तो मिटविण्याचा मार्ग या अभियानातून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

दोन्ही पक्षकारांनी तडजोडीस सहमती दर्शविल्यास, नियमानुसार तडजोडनामा प्राप्त करून घेतल्यानंतर लोकअदालतीच्या दिवशी दोन्ही पक्षांच्या सहमतीने अंतिम आदेश पारित करून प्रकरण कायमस्वरूपी निकाली काढण्यात येणार आहे.

कोणती प्रकरणे या अभियानात घेता येतील?

तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या महसुली दावे व अपील या अभियानात समाविष्ट करण्यात आले आहेत.

तडजोडीसाठी काय करावे?

ज्या न्यायालयात किंवा कार्यालयात महसुली दावा प्रलंबित आहे, त्या ठिकाणी दोन्ही पक्षकारांनी किंवा त्यांच्या वकिलामार्फत शासन निर्णयासोबत दिलेल्या प्रपत्र-अ मधील नमुन्यात तडजोडीसाठी अर्ज सादर करावा.

अर्जाची छाननी करून दोन्ही पक्षकारांची संमती निश्चित करण्यात येईल. त्यानंतर कायदेशीर तडजोडनामा घेऊन लोकअदालतीच्या दिवशी प्रकरण निकाली काढण्यात येईल.

आवाहन

निफाड तालुक्यातील ज्या शेतकरी व नागरिकांचे महसुली दावे अथवा अपील दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत आणि संबंधित प्रकरणात दोन्ही पक्षकार परस्पर सहमतीने तडजोड करण्यास तयार आहेत, त्यांनी या अभियानाचा लाभ घ्यावा.

जमिनीचा वाद वर्षानुवर्षे सुरू ठेवण्यापेक्षा, सहमतीने तोडगा काढून आपली शेती, वेळ आणि पैसा वाचवूया.

संबंधित पक्षकारांनी आपल्या प्रलंबित महसुली प्रकरणाची माहिती घेऊन तहसील कार्यालय व उपविभागीय अधिकारी कार्यालय निफाड येथे संपर्क साधावा व तडजोडीसाठी आवश्यक अर्ज सादर करावा.

महसूल लोकअदालत – वादाला विराम, सहमतीने न्यायाचा मार्ग!

तहसील कार्यालय, निफाड

# शासकीय कार्यालयात २८ सप्टेंबर हा आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिवस साजरा करण्यात यावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे, जिल्यातील प्रत्येक शासकीय कार्यालयात २८ सप्टेंबर हा आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिवस साजरा करण्यात यावा. असे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, धाराशिव व गटविकास अधिकारी पंचायत समिती धाराशिव यांना देण्यात आले आहे.

भारतात माहिती अधिकार कायदा दि. १२ऑक्टोबर २००५ पासून लागू करण्यात आला आहे, या कायद्याचा उद्देश म्हणजे शासकीय कामात पारदर्शकता आणणे आहे. या कायद्यामुळे सरकार काय काम करत आहे हे जाणून घेण्याचा अधिकार नागरिकांना मिळाला आहे तसेच हा कायदा लोकशाहीचे बळकटीकरण करण्यास उपयोगी ठरत आहे, या कायद्यामुळे शासकीय कामाची माहिती उघड होत असल्यामुळे कामकाजातील भ्रष्टाचार कमी होण्यास मदत होत आहे, शासनाने वेळोवेळी जाणीवपूर्वक उचललेल्या पावलामुळे अल्पावधीतच राज्यात हा कायदा लक्षणीय स्वरूपात लोकाभिमुख झाला आहे महाराष्ट्रात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याच्या व्यापक प्रसिद्धीकरिता व प्रभावी अंमलबजावणी करिता शासन स्तरावरून सर्वतोपरी




उपाययोजना करण्यात येत आहेत, दिनांक २८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर माहिती अधिकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो या दिवशी माहितीचा अधिकार अधिनियम या कायद्यातील तरतुदी आणि कार्यपद्धती, विविध द्रकश्राव्य माध्यमातून व्यापक प्रसिद्धी देऊन व विविध उपक्रम राबवून त्या जास्तीत जास्त नागरिकापर्यंत पोहोचविण्याचा शासनाचा मानस आहे यास्तव प्रतिवर्षी २८ सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिन म्हणून राज्यभर साजरा करण्यात यावा असा निर्णय शासनाने घेतला आहे..

महाराष्ट्र शासनाने २० सप्टेंबर २००८ रोजी (शासननिर्णय संगणक सांकेतांक क्रमांक-२००८०९२०१५५३१८००१) निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील आदेशानुसार धाराशिव जिल्हा परिषद च्या अधीनस्थ असलेल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्था,ग्रामपंचायती यांना अधिकृतपत्राद्वारे सूचना घेऊन २८ सप्टेंबर २०२६ रोजी माहिती अधिकार दिन साजरा करून माहितीच्या अधिकाराबाबत समाजात व्यापक प्रमाणात जनजागृती करण्याबाबत श्री प्रकाश गणपती सोनार,(सदस्य)माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशन मुंबई, यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,धाराशिव तसेच गट विकास अधिकारी,पंचायत समिती,धाराशिव यांना निवेदन दिले आहे.

# सोलापूर जिल्हा कोरडा दुष्काळ जाहीर करावा तसेच अक्कलकोट तालुक्यातील २०२५ सालाचे पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना त्वरित मिळण्यासाठी रासपचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा कोरडा दुष्काळ जाहीर करावा तसेच अक्कलकोट तालुक्यातील २०२५ सालाचे पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना त्वरित मिळावी याबाबतचे निवेदन सोलापूरचे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांना निवेदन देण्यात आले. यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य भिवाजी वावरे, अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय मडकर, सोलापूर जिल्हा युवक आघाडी अध्यक्ष साहिल बंडगर, दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष तात्यासाहेब व्हनमाने, तमण्णा घोडके, नरेंद्र लोभे आदी उपस्थित होते. शेतकरी व पशुधनाला चालू हंगामात पर्जन्यमान अत्यंत कमी झाल्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील



अनेक तालुक्यातील शेतकऱ्यांची खरीप पिके जळून जात आहेत. शेतकऱ्यांच्या हाता तोंडाला आलेला घास निघून जात आहे, पावसाअभावी शेतीचे फार मोठे नुकसान होत असून पिण्याच्या पाण्याचे तसेच जनावरांच्या चारा पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. त्यामुळे शासनाने सोलापूर जिल्हा तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकरी व पशुधनाला अत्यावश्यक मदत उपलब्ध करून द्यावे तसेच सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळ सदृश्य परिस्थितीची तातडीने पाहणी करून कोरडा दुष्काळ जाहीर करावा. दुष्काळग्रस्त भागात जनावरासाठी पुरेसा चारा व पिण्याचे पाणी यासह चारा छावण्या सुरू कराव्यात. शेतकरी व पशुधनाला दुष्काळाच्या संकटातून दिलासा मिळवण्यासाठी शासनाने तातडीने अत्यावश्यक आर्थिक व प्रशासकीय उपायोजना करून द्याव्यात सन २०२५ साली पिक विमा मधून अक्कलकोट तालुक्याला वगळण्याने अनेक शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सोसावे लागले आहे. तरी अक्कलकोट तालुक्यातील पिक विमा भरलेल्या सर्व शेतकऱ्यांना पिक विमा त्वरित मंजूर करून घ्यावा अशी राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने आपणास विनंती करण्यात येत आहे. तरी वरील सर्व मागणीचे येणाऱ्यांना पंधरा दिवसांत जर कोणत्याही प्रकारची उपाययोजना होत नसल्याची दिसुन आल्यास राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे.

# पडघा बस स्थानक परिसरातील धोकादायक झाडाची जबाबदारी नेमकी कुणाची?




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा बस स्थानक परिसरातील धोकादायक व जीर्ण अवस्थेतील झाडाच्या निष्कासनावरून पडघा ग्रामपंचायत आणि पडघा वनपरिक्षेत्र विभाग यांच्यात जबाबदारी ढकलण्याचा प्रकार सुरू असल्याचे चित्र आहे. त्यामुळे धोकादायक झाडाचा प्रश्न अद्यापही कायम असून, एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

पडघा बस स्थानकाला लागून असलेल्या वनविभागाच्या डेपोच्या कंपाऊंडमध्ये रेन ट्री जातीचे एक झाड जीर्ण व धोकादायक अवस्थेत आहे. या झाडामुळे प्रवासी, विद्यार्थी, नागरिक तसेच वाहनचालकांच्या सुरक्षेला धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पडघा पोलीस ठाण्याच्या माध्यमातून पडघा ग्रामपंचायत आणि पडघा वनपरिक्षेत्र कार्यालयाला लेखी निवेदन देण्यात आले होते.

> **झाडाच्या निष्कासनावरून ग्रामपंचायत-वनविभाग आमनेसामने; दोन्ही विभागांकडून एकमेकांकडे बोट**

मात्र, यानंतर झाडाच्या निष्कासनाची जबाबदारी नेमकी कोणाची, यावरून दोन्ही विभागांकडून एकमेकांकडे बोट दाखविले जात असल्याचे समोर आले आहे.

वनविभागाचा दावा पडघा वनपरिक्षेत्र कार्यालयाने दिलेल्या पत्रात, सदरची बाब पडघा वनपरिक्षेत्राच्या कार्यक्षेत्रात येत नसल्याचे नमूद करून याबाबत ग्रामपंचायत पडघा यांच्याशी संपर्क साधावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.पडघा ग्रामपंचायतीचा दावा दुसरीकडे, सदर धोकादायक वृक्ष हा पडघा वनविभागाच्या डेपोच्या कंपाऊंडच्या आत असल्याचे ग्रामपंचायतीकडून सांगण्यात आले आहे. ग्रामपंचायतीच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन झाडाची पाहणी केली असून, कंपाऊंड वनविभागाच्या ताब्यात असल्याने सदर धोकादायक झाडाच्या निष्कासनाची जबाबदारी पडघा वनविभागाची असल्याचे ग्रामपंचायतीच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

पडघा बस स्थानक परिसरात दररोज विद्यार्थी, प्रवासी, नागरिक आणि वाहनांची मोठी वर्दळ असते. अशा संवेदनशील ठिकाणी जीर्ण अवस्थेतील झाड कोसळल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ‘झाड कुणाच्या हद्दीत आहे?’ यापेक्षा ‘नागरिकांची सुरक्षा कुणाची जबाबदारी?’ हा प्रश्न महत्त्वाचा ठरत आहे.

दोन्ही विभागांनी एकमेकांकडे जबाबदारी ढकलण्याऐवजी तातडीने संयुक्त पाहणी करून धोकादायक झाडाबाबत योग्य निर्णय घ्यावा आणि संभाव्य दुर्घटना टाळावी, अशी चर्चा पडघा परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध; ३० सप्टेंबरपर्यंत दाव, हरकती दाखल करा : डॉ. शशिकांत मंगरुळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल पुनरीक्षण २०२६ अंतर्गत निफाड विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी दिनांक ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मतदारांनी प्रारूप यादीत आपले नाव तसेच मतदार यादीतील इतर तपशील तपासून घ्यावेत, असे आवाहन निफाडचे उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांनी केले आहे.

प्रारूप मतदार यादीत नाव नसल्यास पात्र मतदारांनी घाबरून न जाता विहित मुदतीत दावा दाखल करावा. तसेच नाव, पत्ता, वय, लिंग, छायाचित्र अथवा अन्य तपशीलात त्रुटी आढळल्यास त्याबाबत दुरुस्तीचा दावा किंवा हरकत दाखल करता येणार आहे.

मतदारांनी स्वतःच्या नावासह कुटुंबातील प्रत्येक सदस्याचे नाव प्रारूप मतदार यादीत आहे की नाही, याची खात्री करावी. विशेषतः वृद्ध व्यक्ती, स्थलांतरित झालेले सदस्य तसेच विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेदरम्यान पडताळणी न झालेल्या मतदारांनी आपली नोंद काळजीपूर्वक तपासावी. सन २०२५ च्या मतदार यादीत नाव असतानाही २०२६ च्या प्रारूप यादीत नाव आढळत नसल्यास संबंधित मतदारांनी महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या

विशेष सखोल पुनरीक्षण पोर्टलवरील यादीत आपली नोंद तपासावी. महाराष्ट्र निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर विशेष सखोल पुनरीक्षण प्रारूप मतदार यादी, विशेष सखोल पुनरीक्षण संदर्भातील विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

प्रारूप मतदार यादीविरोधात दिनांक ३१ ऑगस्ट ते दिनांक ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती दाखल करता येतील. नाव समाविष्ट करण्यासाठी आवश्यकतेनुसार नमुना क्रमांक ६, तर विद्यमान नोंदीतील दुरुस्ती किंवा अद्ययावतीकरणासाठी नमुना क्रमांक ८ वापरता येईल. प्राप्त दावे व हरकतींची आवश्यक कार्यवाही व सुनावणी करून दिनांक २२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत त्यांचे निराकरण करण्यात येणार असून, त्यानंतर दिनांक २७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

मतदारांनी प्रारूप यादीत आपले नाव, नावाची स्पेलिंग, वडिलांचे अथवा पतीचे नाव, वय/जन्मतारीख, लिंग, पत्ता, छायाचित्र, इपिक क्रमांक आणि मतदान केंद्र यांची पडताळणी करावी. त्रुटी आढळल्यास अंतिम यादी प्रसिद्ध होण्यापूर्वी विहित मुदतीत दावा किंवा हरकत दाखल करावी. प्रारूप मतदार यादी ही अंतिम यादी नसून दुरुस्तीची संधी उपलब्ध आहे. त्यामुळे मतदारांनी दिनांक ३० सप्टेंबरची मुदत न चुकवता आपली व कुटुंबातील सर्व मतदारांची नावे तपासून आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आवाहन प्रांताधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांनी केले आहे.

**शांतता व सामाजिक सलोखा निर्माण करणारा उत्सव आहे सर्व समाज घटकांनी एकत्र येऊन हा उत्सव साजरा करावा**

# डीजे न लावता पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करावा : पोलीस अधीक्षक रितुजी खोकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे -: गणेशोत्सव हा संपूर्ण देशभरात मोठ्या उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा केला जाणारा प्रेरणादायी उत्सव आहे. या उत्सवाच्या माध्यमातून समाजात शांतता, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा निर्माण होण्यासाठी सर्व समाज घटकांतील नागरिकांनी एकत्र येऊन उत्सव साजरा करावा. गणेशोत्सवा दरम्यान डी जे चा वापर न करता पारंपरिक पद्धतीने उत्सव साजरा करावा, असे आवाहन धाराशिव जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक रितूजी खोकर यांनी केले.

नळदुर्ग शहरात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या वतीने शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मार्गदर्शन करताना पोलीस अधीक्षक खोकर बोलत होत्या.

गणेश विसर्जन मिरवणुकीच्या मार्गाची पोलीस प्रशासनाकडून पाहणी करण्यात येणार असून, प्रत्येक गणेश मंडळासमोर एक रजिस्टर ठेवण्यात यावे. त्या रजिस्टरमध्ये संबंधित पोलिस कर्मचारी स्वाक्षरी करून उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी आपला सहभाग नोंदवेल असेही त्यांनी सांगितले.

गणेशोत्सव हा केवळ एखाद्या व्यक्तीची किंवा मंडळाची जबाबदारी नसून, संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. उत्सव साजरा करताना आजारी व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच लहान मुलांना ध्वनि प्रदूषणाचा त्रास होणार नाही, याची प्रत्येकाने काळजी घेणे आवश्यक आहे. कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी सर्व समाज घटकांनी एकत्रितपणे सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रथम नागरिक नगराध्यक्ष बसवराज धरणे हे होते .कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपविभागीय पोलीस अधिकारी मनोहर पाटील यांनी केले. यावेळी नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रविंद्र गायकवाड, सहाय्यक पोलिस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके, साहय्यक पोलीस निरीक्षक आनंद कांगुणे,सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अकतर सय्यद, महसूल विभागाचे नायब तहसीलदार हे उपस्थित होते.

यावेळी नळदुर्ग शहराचे प्रथम नागरिक बसवराज आप्पा धरणे उपनगराध्यक्ष नय्यर जागीरदार नगरसेवक तथा काँग्रेसचे गटनेते मारुती खारवे, माजी नगरसेवक विनायक अहंकारी, उबाठाचे संतोष पुदाले, उबाठाचे नेते माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण , आदिनी आप आपले मनोगत व्यक्त केले

बैठकीस नळदुर्ग नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक भाजपाचे गटनेते दत्तात्रय दासकर, पंचायत समिती सदस्य अशिष सोनटक्के नगरसेविका मीनाक्षीताई काळे नगरसेविका क्षमाताई राठोड, क्रीडा व शिक्षण सभापती इमाम शेख, बांधकाम सभापती शशिकांत पुदाले, नगरसेवक रिजवान काझी, नगरसेवक सुधीर पोतदार, नगरसेवक आकाश कुलकर्णी, महावितरण चे अभियंता डी एम तगारे, माजी नगरसेवक किशोर नळदुर्गकर सामाजिक कार्यकर्ते धनराज गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते मुकुंद नाईक, सरदारसिंग ठाकूर लहुजी शक्ती सेनेचे शिवाजी गायकवाड, अभियंता स्वप्नील काळे, ज्येष्ठ पत्रकार विलास येडगे, पत्रकार दादासाहेब बनसोडे, पत्रकार उत्तम बनजगोळे, पत्रकार आयुब शेख




पत्रकार लतीफ मामा शेख काँग्रेसचे अबेदिन कुरेशी, सिकंदर अंगुले सह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शांतता कमिटीची बैठक यशस्वी करण्यासाठी पोलीस अधिकारी यांच्यासह पोलीस कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# महिलांच्या सबलीकरणासाठी प्रादेशिक तफावत दूर करावी

## केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान; बँक अधिकाऱ्यांनी केवळ कर्तव्य म्हणून नव्हे, तर संवेदनशीलतेने काम करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ग्रामीण भागातील महिला बचतगटांना केवळ शासकीय योजनांपुरते मर्यादित न ठेवता त्यांना सक्षम उद्योजक बनवण्यासाठी बँकांनी संवेदनशीलतेने आणि सर्वोत्कृष्ट योगदान देऊन काम करावे, असे प्रतिपादन केंद्रीय कृषी, शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केले.

मुंबईतील हॉटेल हयात येथे आयोजित 'स्वयं सहाय्यता गट-बँक संलग्नता' या राष्ट्रीय आढावा बैठकीच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. या राष्ट्रीय परिषदेला केंद्रीय ग्रामीण विकास राज्यमंत्री कमलेश पासवान, केंद्रीय ग्रामीण विकास व दळणवळण राज्यमंत्री डॉ. चंद्रशेखर पेम्मासानी, महाराष्ट्राचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम, केंद्रीय ग्रामीण विकास सचिव रोहित कंसल आणि महाराष्ट्र ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्यासह देशभरातील वरिष्ठ अधिकारी, बँक व्यवस्थापक उपस्थित होते.

मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील ६ कोटी लखपती दीदी घडवण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी जिल्हा आणि तालुका पातळीवरील प्रशासनाने महिलांच्या अर्जांवर त्वरित कार्यवाही करून 'मिशन मोड'वर काम करावे. देशातील ३ कोटी 'लखपती दीदीं'चा टप्पा गाठणे तुलनेने सोपे होते; मात्र आता ६ कोटींचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी वर्षाला ३० ते ५० हजार रुपये उत्पन्न असणाऱ्या तळागाळातील महिलांना लखपती बनवावे लागेल .



अनेकदा आधीच संपन्न असणाऱ्या भागांत बँका सहजासहजी कर्जवाटप करतात. मात्र 'जिथे खरी गरिबी आहे, तिथे बँकांनी अधिक लक्ष पुरवणे आवश्यक आहे. ग्रामीण महिलांना सर्वात जास्त अडचणी बँक पातळीवरच येतात, हे नमूद करत त्यांनी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि संवेदीकरण करण्यावर भर दिला. तसेच, जिल्हास्तरीय सल्लागार समितीच्या बैठकांना अनेक खासगी बँकांचे प्रतिनिधी दांडी मार-तात, अशी तक्रार आल्याचे सांगत त्यांनी खासगी बँकांच्या उदासीनतेवर नाराजी व्यक्त केली.

**नियमित आढावा आणि रोडमॅप**

अनेक बँकांनी उद्दिष्टापेक्षा दीड ते दोन पट कामगिरी केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करत मंत्र्यांनी पुढील वाटचालीसाठी प्रत्येक तीन महिन्यांनी व्हर्च्युअल आणि दर सहा महिन्यांनी प्रत्यक्ष आढावा बैठक होईल. सर्व सूचनांचे पालन करत बचतगटातील महिलांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण याचा मासिक, तिमाही आणि ६ महिन्यांच्या कालावधीने आढावा घेण्यात येईल. यासाठी सर्वांनी वेळेत निश्चित उद्दिष्टे पूर्ण करणे अनिवार्य असल्याचे केंद्रीय मंत्री चौहान यांनी सूचित केले.

**सर्व प्रमुख वित्तीय संस्थांचे मंथन**

सकाळच्या सत्रात केंद्रीय मंत्र्यांनी बचत गटांच्या प्रतिनिधींशी व राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या (डठडच्) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. पुणे आणि उत्तर प्रदेशातील प्रतिनिधींनी मांडलेल्या कर्ज मंजुरीतील अडथळ्यांची गंभीर दखल घेण्यात आली . आरबीआय मार्गदर्शक तत्त्वांचा अभ्यास करून बँकिंग प्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी उच्चस्तरीय बैठक घेऊन कर्ज प्रक्रियेत पारदर्शकता आणणारे ठोस धोरण लागू केले जाईल. कर्ज मंजुरीत डिजिटल अडथळा ठरू नये म्हणून 'जनसमर्थ पोर्टल'वरील तांत्रिक त्रुटी तातडीने दूर केल्या जातील. तसेच लडाखसारख्या दुर्गम भागांसाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले .

**समर्पित हेल्पलाइन**

उमेद व डीएनवाय-एनआरएलएम मधील महिलांना बँकिंग प्रक्रिया, योजनांची माहिती आणि तक्रार निवारणासाठी एकाच छताखाली मार्गदर्शन मिळण्यासाठी लवकरच विशेष हेल्पलाइन सुरू करण्यात येणार आहे. या बैठकीत महिलांना उद्योग उभारणीसाठी बँकांकडून कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणी आणि जनसमर्थ पोर्टलवरील तांत्रिक त्रुटींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

### विविध राज्यांचा सहभाग

**महाराष्ट्र, राजस्थान, तेलंगणा, उत्तर प्रदेश, आसाम, उत्तराखंड अशा विविध राज्यांतील महिलांनी थेट केंद्रीय मंत्र्यांसमोर आपली गाऱ्हाणी मांडली. महिलांनी उद्योगासाठी आवश्यक बँक कर्ज मिळण्यात येणाऱ्या विलंब व नियमांच्या गुंतागुंतीबाबत प्रश्न उपस्थित केले. विविध राज्यांच्या अभियान मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी 'जनसमर्थ पोर्टल' वापरताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी मांडल्या; तसेच लडाखसारख्या दुर्गम भागात काम करताना उद्भवणाऱ्या भौगोलिक आव्हानांवर चर्चा केली.**

**आरबीआय मार्गदर्शक तत्त्वांचे पुनरावलोकन**

बँक कर्जाबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमावलीचा सखोल अभ्यास केला जाईल. बँकांकडून महिलांना त्रास होऊ नये यासाठी आरबीआयच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा करून धोरणात्मक तोडगा काढला जाईल. तसेच राज्यांच्या अधिकाऱ्यांसोबत संपूर्ण अभियानाचा आढावा घेऊन महिलांनी मांडलेल्या सर्व अडचणी तातडीने दूर करण्याचे स्पष्ट निर्देश मंत्र्यांनी दिले. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण हेच सरकारचे मुख्य ध्येय असून, देशात ६ कोटी लखपती दीदी तयार करण्याचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व यंत्रणांनी मिशन मोडवर काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, देशातील ६ कोटींच्या उद्दिष्टात महाराष्ट्रात सध्या ५० लाख लखपती दीदी असून, राज्य शासनाने १ कोटी लखपती दीदी घडवण्याचे लक्ष्य ठेवले आहे. राज्यात सध्या ६ लाख ७२ हजार बचत गट व ३४ हजार ८८५ ग्रामसंघ कार्यरत आहेत; नवीन बचत गट स्थापन करणे आणि बँक खाती उघडणे या प्रक्रियेला गती दिली जात आहे. बचत गटांचा कर्ज परतफेडीचा इतिहास उत्तम आणि एनपीए अत्यंत कमी असल्याने बँकांनी महिला उद्योजकतेला बळ देण्यासाठी कर्ज प्रक्रिया सुलभ व गतिमान करावी, असे आवाहन ग्रामविकास मंत्र्यांनी केले. राज्यमंत्री योगेश कदम यांनी आदिवासी बहुल भागात विशेष लक्ष देणे, महिलांचे डिजिटल व्यवहार नोंदवणे आणि लखपती दीदी उद्दिष्टपूर्तीसाठी महिलांना वैयक्तिक कर्ज उपलब्ध करून देण्यावर भर दिला. केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास विभागाचे सहसचिव अमित शुक्ला यांनी 'दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान' अंतर्गत 'आर्थिक समावेशन २.०', 'बीसी सखी' उपक्रम आणि वित्तीय साक्षरतेचा कृती आराखडा सादर केला. ग्रामीण भागातील महिला बचत गटांचे रूपांतर यशस्वी वैयक्तिक उद्योगांत करण्यासाठी सुलभ व जलद कर्जपुरवठा करण्यावर बैठकीत एकमुखाने सहमती दर्शवण्यात आली. या परिषदेत स्टेट बँक, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ इंडियासह १२ सार्वजनिक क्षेत्रातील बँका, आयसीआयसीआय, एचडीएफसीसह ४ खासगी बँका, ११ प्रादेशिक ग्रामीण बँकांचे (ठठइ) अध्यक्ष, विविध राज्यांच्या सहकारी बँकांचे व्यवस्थापकीय संचालक तसेच आरबीआय, नाबार्ड, नीती आयोग, वित्तीय सेवा विभाग आणि पीएफआरडीएचे उच्चपदस्थ प्रतिनिधी उपस्थित होते.

# गडचिरोली ग्रीन स्टीलचे जागतिक केंद्र म्हणून विकसित होणार : मंत्री जयकुमार रावल



**महाराष्ट्राच्या हरित औद्योगिक विकासाला चालना**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राच्या औद्योगिक भविष्यास नवी दिशा देणारा आणि शाश्वत औद्योगिकीकरणाला चालना देणारा महत्वपूर्ण टप्पा गाठण्यात आला आहे. जॉन कॉकरिल इंडिया लिमिटेडसोबत करण्यात आलेला सामंजस्य करार हा केवळ औद्योगिक गुंतवणुकीचा करार नसून गडचिरोलीला ग्रीन स्टील उत्पादनाचे जागतिक केंद्र म्हणून विकसित करण्याच्या महत्वाकांक्षी संकल्पाचा पाया असल्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

या करारासंदर्भात आयोजित बैठकीत जॉन कॉकरिल इंडिया लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक, डॉ. फ्रेडरिक मार्टिन, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बळगन, राजशिष्टाचार विभागाचे सचिव डॉ. राजेश गवांदे आदी उपस्थित होते.

यावेळी पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली महाराष्ट्र हे जागतिक गुंतवणूक, अत्याधुनिक तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि शाश्वत औद्योगिक विकासाला चालना देणारे अव्वल राज्य आहे. राज्याचा विकास हा केवळ आर्थिक वाढीपुरता मर्यादित नसून सर्वसमावेशक आणि संतुलित प्रादेशिक विकासावर आधारित आहे. गडचिरोलीतील हा उपक्रम केवळ नवीन उद्योग उभारण्यापुरता मर्यादित राहणार नाही, तर संपूर्ण जिल्ह्याच्या औद्योगिक परिवर्तनाचा पाया ठरेल. या प्रकल्पामुळे अत्याधुनिक हरित तंत्रज्ञान, मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक, रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास आणि स्थानिक युवकांसाठी नवीन संधी उपलब्ध होतील. विदर्भातील नैसर्गिक व खनिज संपत्तीला पर्यावरणपूरक उत्पादन प्रक्रियेची जोड देत जबाबदार औद्योगिक विकासाचे आदर्श मॉडेल उभारले जाईल.

पणन मंत्री रावल म्हणाले की, महाराष्ट्र शासनाच्या राजशिष्टाचार, परकीय थेट गुंतवणूक व प्रवासी भारतीय संपर्क विभागाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय औद्योगिक भागीदारी अधिक मजबूत करण्यात येत आहे. जॉन कॉकरिलसोबतची ही भागीदारी राज्याला हरित पोलाद उत्पादन आणि निर्यातीसाठी जागतिक स्तरावर नवे स्थान मिळवून देईल.

४ सप्टेंबर रोजी बेल्जियमचे पंतप्रधान यांच्या उपस्थितीत या सामंजस्य कराराची औपचारिक देवाणघेवाण होणार असून, या सहकार्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर नवे बळ आणि प्रतिष्ठा प्राप्त होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या हरित औद्योगिक विकासाला जागतिक मान्यता मिळण्यास मोठी मदत होईल.

शासनाकडून या प्रकल्पासाठी आवश्यक सर्व परवानग्या, धोरणात्मक प्रोत्स-ाहन, सुलभ सुविधा आणि उद्योगपूरक परिसंस्था उपलब्ध करून देण्यात येणार असून स्थानिक युवकांच्या कौशल्य विकासावर विशेष भर दिला जाणार असल्याचेही मंत्री जयकुमार रावल यांनी स्पष्ट केले. गडचिरोलीची ओळख केवळ नैसर्गिक संपत्तीपुरती मर्यादित न राहता ती ग्रीन स्टील, नवोपक्रम आणि शाश्वत उद्योगांचे जागतिक केंद्र म्हणून निर्माण व्हावी, ही राज्य शासनाची स्पष्ट दृष्टी आहे. महाराष्ट्र नैसर्गिक संसाधनांपासून अत्याधुनिक तंत्रज्ञानाकडे, पारंपरिक उद्योगांपासून हरित उद्योगांकडे आणि देशांतर्गत उत्पादनापासून जागतिक निर्यातक्षमतेकडे वाटचाल करण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे, असे यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी जॉन कॉकरिल इंडिया लिमिटेडचे महाराष्ट्रावर विश्वास दाखवल्याबद्दल आभार मानले.

# महाप्रसाद, लंगर, भंडाऱ्यांमधील अन्नाची गुणवत्ता आता रडारवर

(पान १ वरून...) प्रयोगशाळांना पूर्वसूचना. दुसरा टप्पा (नाका तपासणी): गिरण्या, घाऊक मंड्या आणि वाहतुकीवर लक्ष. पहाटेच्या वेळी विशेष नाका तपासणी. तिसरा टप्पा (सणाचा दिवस): सणाच्या दिवशी विशेष भरारी पथकांद्वारे प्रत्यक्ष ठिकाणांची सरप्राईज तपासणी. चौथा टप्पा (कायदेशीर कारवाई): दोषीं-वर खटले दाखल करणे आणि अहवाल आयुक्तांकडे सादर करणे. अन्नपदार्थानुसार 'हाय रिस्क' तपासणीचे नियोजन उपवासाचे पदार्थ व दुग्धजन्य उत्पादने: भगर, साबुदाणा, राजगिरा यांचे आधीच नमुने घेणे तसेच बुरशीजन्य पदार्थांवर बारीक लक्ष ठेवणे. मांस, पाणी व बर्फ: स्वच्छता, शीत साखळी (उेश्रव उहरळप) आणि अधिकृत कत्तलखान्यांची वैधता तपासणे. सजावट व रंग: मिठाईवर वा-परला जाणारा चांदीचा वरख खरोखर शुद्ध चांदीचा आहे की नाही आणि खाद्यरंगांची मर्यादा तपासणे. विशेष सण तप-ासणी: अक्षय्य तृतीयेला फळे पिकवण्याच्या पद्धती, नात-ाळमध्ये बेकरी उत्पादने, तर रमजान आणि ईद काळात विशेष अन्न तपासणी. झिरो टॉलरन्स आणि त्वरित खटले ई-कॉमर्स, आयात अन्नपदार्थ, बेकरी आणि पॅकबंद पाणी या सर्वांवर एफडीएची कडक नजर असेल. 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवले जात असून, सण-उत्सवांमध्ये कोणतीही अप्रिय घटना घडू नये हा यामागील मुख्य उद्देश आहे. सण संपल्यानंतर १४ दिवसांच्या आत आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून दोषींवर न्यायालयात खटले दाखल केले जातील. इथून पुढे प्रत्येक सणासाठी वेगळा आदेश काढण्याची गरज उरणार नसून, हा स्थायी आदेश पूर्ण वर्षासाठी लागू राहील.

**शिक्षक दिनानिमित्त विशेष शिक्षकांचा प्रातिनिधिक सत्कार**

**राज्यातील सर्व विशेष शिक्षकांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करणार**

# सर्वसमावेशक विकास हाच 'विकसित महाराष्ट्र २०४७'चा मुख्य आधारस्तंभ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सर्वसमावेशक विकास हा आपल्या भारतीय संस्कृतीचा मूळ गाभा असून समाजात जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलाला योग्य संधी व वातावरण मिळणे गरजेचे आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' या ध्येयाकडे वाटचाल करताना समाजा-तील प्रत्येक घटकाचा विकास होणे आवश्यक असून 'दिशा' अभियानाच्या माध्यमातून विशेष मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली जात आहे. या अभियानाशी जोडलेल्या राज्यातील सर्व विशेष शिक्षकांना त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल राज्य शासनाच्या वतीने प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.विशेष मुलांना योग्य शिक्षण, संधी आणि वातावरण उपलब्ध करुन देणे ही सामूहिक जबाबदारी असून या क्षेत्रात महाराष्ट्र देशासाठी दिशादर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.

शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थ-ानी आयोजित कार्यक्रमात विशेष शिक्षकांचा प्रातिनिधिक स्वरूपात राज्यस्तरीय सन्मान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास जय वकील फाउंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना चंद्र, एसीईसीएफचे सह संस्थापक अमित चंद्र, जय वकील फाऊंडेशनच्या अध्यक्ष व संचालक डॉ. अनायता हेगडे, बजाज फिनसर्व्हच्या अध्यक्षा शेफाली बजाज, एचटी पारेख फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी झिया लालकाका, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव माणिक गुरसळ, आयुक्त सत्यजित बडे, समग्र शिक्षा अभियानचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव, राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्थानचे संचालक राम कुमार, मुख्यमंत्री यांच्या विशेष कार्य अधिकारी प्रिया खान यांच्यासह राज्यभरातील विशेष शिक्षक ऑनलाईन उपस्थित होते.

**'दिशा' अभियान राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विशेष मुलांचे मूल्यमापन केवळ गुणांवर न होता, त्यांचा आत्मविश्वास आणि समाजात समरस होण्याची क्षमता यावर होते. सर्व शाळांमध्ये 'दिशा' अभियान स्वीकारणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. सध्या राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये ४५० हून अधिक शाळा, २७०० हून अधिक शिक्षक आणि २१ हजारांहून अधिक दिव्यांग व बौद्धिक अक्षम विद्यार्थी या अभियानाशी जोडले गेले आहेत. या मुलांना वैज्ञानिक आणि नव्या अध्यापन तंत्राच्या आधारे शिक्षण देण्यासाठी लागणारी साधनसामग्री या उपक्रमामुळे उपलब्ध झाली आहे.

या कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरूपात पाच शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यांत समारंभपूर्वक सर्व विशेष शिक्षकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करावे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. 'दिशा' अभियान हा शासनाच्या प्राधान्यक्रमातील महत्त्वाचा उपक्रम असून, याच्या प्रगतीचा व अडचणींचा 'वॉर रूम' मधून नियमित आढावा घेतला जाईल, दिव्यांग कल्याण विभागामार्फत दरव-र्षी प्रत्येक विशेष मुलापर्यंत व त्याच्या कुटुंबापर्यंत दिशा अभियानाची उपयुक्त छापील वर्कबुक्स पोहोचविली जातील, त्याचप्रमाणे नियमित शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या बौद्धिक अक्षमता असलेल्या बालकांसाठी नियमित शिक्षकांच्या प्रशिक्षणात या अभ्यासक्रमाचा अंतर्भाव करण्यासाठी दिव्यांग कल्याण विभाग आणि जय वकील फाऊंडेशन एकत्रित प्रयत्न करतील आणि बालकांमधील विशेष गरजांची वेळीच ओळख व्हावी यासाठी विशेष 'प्रशिक्षण मॉड्यूल' विकसित करण्यात येईल, असे सांगून यासाठी जय वकील फाऊंडेशनने पुढाकार घ्यावा, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.



राज्य शासनासह समाज आणि सेवाभावी संस्थांच्या एकत्रित सहभागामुळे या क्षेत्रात मोठे काम उभे राहिले असून, या मॉडेलच्या माध्यमातून महाराष्ट्र दिव्यांग शिक्षणाच्या क्षेत्रात संपूर्ण देशात दिशादर्शक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. जय वकील फाउंडेशन, बजाज फिनसर्व्ह, एचटी पारेख फाउंडेशन आदी सामाजिक संस्थांनी या संवेदनशील विषयावर दाखविलेल्या पुढाकाराबद्दल त्यांनी विशेष आभार मानले.

**शिक्षकांचा प्रातिनिधीक सन्मान**

बौद्धिक अक्षम मुलांसाठी भारतातील पहिला प्रमाणित व एकसमान अभ्यासक्रम असलेल्या 'दिशा अभियानाची' प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल यामिनी काळे (नवजीवन मतीमंद मुलांची शाळा, छत्रपती संभाजीनगर), अण्णासाहेब कदम (पांडुरंग निवास मतीमंद विद्यालय, लातूर), वैशाली गायकवाड (नंदनवन दुर्बल मनस्क मुलांची शाळा, नागपूर), ज्ञानेश्वर काळे (कै. रावसाहेब निवासी मतीमंद विद्यालय, देवळी, वर्धा) आणि मानसी मुलाम, जय वकील स्कूल फॉर चिल्ड्रन इन नीड ऑफ स्पेशल केअर, मुंबई शहर या पाच विशेष शिक्षकांच्या उल्लेखनीय कार्याचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

दिव्यांग कल्याण विभागाचे आयुक्त सत्यजित बडे यांनी प्रास्ताविकाद्वारे विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची तर अर्चना चंद्र यांनी जय वकील फाऊंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या दिशा अभियानाची माहिती दिली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या विशेष कार्य अधिकारी प्रिया खान यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.